वाचले :

१) सह शहर अभियंता (शहरी दळणवळण विभाग) अभिनामाचे पद पदोन्नतीने भरण्याकरीता गठीत करण्यात आलेल्या दिनांक ०४.०२.२०२५ रोजीच्या पदोन्नती समितीचा सभावृत्तांत

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी, पुणे ४११ ०१८
सामान्य प्रशासन विभाग
क्र.साप्रवि/२/कावि/१५/२०२५
दिनांक - ७ / २ /२०२५

विषय : **पदोन्नतीकरीता लहान कुटुंब प्रतिज्ञापन सादर करणे बाबत.**

आदेश,

महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र ) नियम, २००५ अधिसूचना दिनांक २८ मार्च, २००५ रोजी राज्यात लागू केली आहे. त्यानुसार दोन अपत्यांपेक्षा अधिक अपत्ये असणारी व्यक्ती शासकीय नोकरीसाठी अपात्र ठरविण्यात आलेली आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर नामनिर्देशनाव्दारे नियुक्त झालेल्या गट ‘अ’ ते ‘ड’ संवर्गातील उमेदवारांकडून उक्त अधिनियमातील विहित तरतुदींनुसार प्रतिज्ञापन घेण्यात येते. मात्र उक्त अधिनियमाचे दिनांका नंतर दोन अपत्यांपेक्षा अधिक अपत्ये असल्याच्या तक्रारी कार्यालयास प्राप्त होतात. असे अधिकारी व कर्मचारी अधिनियमातील तरतुदींचे उल्लंघन करुन महापालिकेची दिशाभूल करीत असल्याची बाबत निदर्शनास आलेली आहे.

सबब, दिनांक ०४.०२.२०२५ रोजी गठीत करण्यात आलेल्या पदोन्नती समितीच्या निर्णयानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवरील गट ‘अ’ ते ‘ड’ संवर्गातील अधिकारी व कर्मचा-यांना पदोन्नती करीता लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन सादर करणे बंधनकारक राहील. पदोन्नती करिता संबंधित अधिकारी अथवा कर्मचा-यांनी खोटे प्रमाणपत्र दिल्यास, अशा अधिकारी व कर्मचा-यांविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

सदरचे परिपत्रक सर्व विभागप्रमुखांनी आपल्या अधिपत्याखालील अधिकारी / कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून द्यावे.

(शेखर सिंह)
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

प्रति,
सर्व संबंधित विभाग/विभागप्रमुख

# प्रतिज्ञापन

नमुना 'अ'

मी, श्री/श्रीम/कुमारी ------------------------------------------------------, श्री -------------------------------------------------------- यांचा /यांची मुलगी/मुलगी/पत्नी, वय ----------वर्षे, राहणार -------------------------------------------------------------------------------------------------------------
याव्दारे पुढील प्रमाणे असे जाहीर करतो/करते की,

१) मी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर --------------------------- (गट-अ/ब/क/ड) पदावर कार्यरत असून पुढील पदोन्नतीकरीता मी प्रतिज्ञापन दाखल करीत आहे.

२) आज रोजी मला ----------------- (संख्या) इतकी ह्यात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८मार्च, २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या -------------------- आहे (असल्यास, जन्मदिनांक नमूद करावा.)

| अ.क्र | अपत्याचे नावं | जन्मदिनांक |
|---|---|---|
| | | |
| | | |

३) ह्यात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च, २००६ नंतर जन्माला आलेल्या, मुलामुळे पदोन्नतीसाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण :

दिनांक : (सही)